पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम
काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम ता.जि.वाशिम - 444505
दुरध्वनी क्रमांक : 07252-232134
ई-मेल- sp.washim@mahapolice.gov.in

प्रेस नोट ०४/२१ दि १/१२/२१

## सैनिकांच्या कुटुंबियांना संरक्षण देण्यासाठी जिल्हास्तरीय समिती गठीत

महाराष्ट्र शासनाच्या वतीने सैनिक कल्याणाकरीता तसेच भारतीय सैन्य दलात सध्या कार्यरत असलेले सैनिक व सेवानिवृत्त झालेल्या सैनिकांना समाजातील समाजकंटका कडुन विनाकारण शारिरीक मानसिक त्रास दिला जातो याचा शासन स्तरावरुन आढावा घेण्यात आला असुन त्यानुसार जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीचे अध्यक्ष मा पोलीस अधिक्षक श्री बच्चन सिंह (भापोसे) हे असुन समितीचे सदस्य अपर जिल्हाधिकारी श्री शहाजी पवार, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी श्री शैलेश हिंगे (निवासी उपजिल्हाधिकारी), महिला पोलीस अधिकारी पोउपनि अश्वीनी धोंडगे, माजी सैनिक श्री उध्दवराव गारकल रा चकोली, अनिल सुर्वे रा कारंजा, श्री आशिष रघुवंशी रा मंगरुळपिर, श्री संजय देशपांडे रा मालेगाव, श्री समाधान इंगोले रा वाटोद ता मानोरा हे समितीचे सदस्य आहेत. यांचे नेतृत्वात आजी माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबियांच्या जमिन अतिक्रमन, त्यांच्यावर झालेले अन्याय, ग्राम पंचायत/नगर पंचायत याबाबतच्या तसेच इतर समस्या सोडविण्याचे दृष्टीने कार्यवाही करण्यात येणार आहे.

तरी वाशिम जिल्हयातील आजी माजी सैनिकांना आपत्कालीन परिस्थीतीत अथवा मदतीची आवश्यकता असल्यास या समिती सोबत संपर्क करावा तसेच तातडीच्या मदती करीता 100/112 या क्रमांकावर सुध्दा कॉल करुन मदत मागविता येणार आहे. याशिवाय आजी माजी सैनिकांनी आपल्या समस्या सोडविण्यासाठी वाशिम पोलीसांचे फेसबुकपेज, ट्वीटर अंकाउट, वेबसाईट(https//www.washimpolice.gov.in, ई मेल(sp.washim@mahapolice.gov.in) यावर तक्रार करणे बाबत समिती कडुन आवाहन करण्यात येत आहे.

1/12/21

[डी.सी. खंडेराव]
पोलीस निरीक्षक, जिविशा
पोलीस अधिक्षक, वाशिम करीता